## निशाणी क्र.१४ वरील आदेश
## (दि.२०.०३.२०२३ रोजी पारीत)

. प्रतिवादी यांच्या विरुध्द् दि.०७.०१.२०२० रोजी पारीत झालेला विना लेखीजबाब आदेश रद्य करण्यात येऊन लेखीजबाब स्वीकारण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

२. प्रतिवादींचे म्हणणे आहे की,वादीने प्रतिवादी बँके विरुध्द् नुकसान भरपाई मिळण्यासाठी प्रस्तुतचा दावा दाखल केलेला असून तो प्रलंबीत आहे. प्रस्तुत प्रकरणात दि.०७.०१.२०२० रोजी प्रतिवादी यांच्या विरुध्द् विना लेखीजबाब आदेश पारीत झालेला आहे. प्रस्तुत दाव्यात प्रतिवादी बँक सन २०२० मध्ये हजर झालेले असून त्यानंतर कोविड–१९ मुळे देशभर लॉकडाऊन घोषीत करण्यात आले होते. वादीने दिलेला धनादेश वटविण्यासाठी अमरावती येथील बँकेत टाकला,परंतु कोविड–१९ मुळे त्याचा तपशील परत येण्यास अडथळा निर्माण झाला होता. तसेच प्रतिवादी बँकेला विहित वेळेत माहिती न मिळाल्यामुळे त्यांना लेखीजबाब दाखल करता आला नाही. प्रस्तुत प्रकरणातील न्यायनिर्णय गुणवत्तेवर लागण्याच्या दृष्टीने त्यांचा लेखीजबाब दाखल करण्याची परवानगी मिळणे आवश्यक आहे. करीता न्यायाच्या दृष्टीने प्रतिवादी विरुध्द् पारीत झालेला विना लेखीजबाब आदेश रद्य करुन त्यांचा लेखीजबाब स्वीकारण्यात यावा अशी विनंती करण्यात आलेली आहे.

३. वादीतर्फे त्यांच्या विधिज्ञांनी लेखी म्हणणे दाखल केले की,प्रस्तुत दाव्यामध्ये दि.२५.०७.२०१९ रोजी प्रतिवादी बँकतर्फे हजर झालेले आहेत. प्रतिवादींना विहित कालावधीत आवश्यक ती माहिती उपलब्ध होऊ शकली असती, परंतु दि.१४.१०.२०२२ रोजी म्हणजे तीन वर्षापेक्षा जास्त कालावधीनंतर प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे. प्रस्तुत प्रकरणात वादीने त्यांचा पुरावा दाखल केलेला असून प्रतिवादी यांनी अर्जामध्ये नमूद केलेले कारण चूकीचे व बनावट आहे. तसेच प्रकरणास विलंब व्हावा या हेतूने प्रस्तुतचा अर्ज दाखल केला असल्याने तो फेटाळण्यात यावा अशी विनंती केलेली आहे.

४. वादी व प्रतिवादी यांच्या विधिज्ञांचा मौखीक युक्तीवाद ऐकला.

५. वादी यांनी प्रतिवादी यांच्या विरुध्द् नुकसान भरपाई मिळण्यासाठी प्रस्तुतचा दावा दाखल केलेला आहे. प्रस्तुत दाव्यामध्ये प्रतिवादी यांना निशाणी क्र.६ प्रमाणे दि.२५.०६.२०१९ रोजी समन्सची बजावणी झाल्याचे बेलिफ अहवालावरुन दिसून येते. तसेच प्रतिवादी दि.२५.०७.२०१९ रोजी विधिज्ञांमार्फत हजर झालेले आहे. त्यानंतर प्रतिवादी यांनी निशाणी क्र.९ व १४ प्रमाणे प्रकरणात लेखीजबाब दाखल करण्यास अवधी मंजूर करण्याबाबत अर्ज दाखल केलेले असून ते मंजूर झालेले आहेत आणि प्रतिवादी विरुध्द् दि.०७.०१.२०२० रोजी विना लेखीजबाब आदेश

पारीत झालेला आहे. दिवाणी प्रक्रिया संहिता अन्वये प्रकरणात लेखी म्हणणे कमीत कमी ३० आणि जास्तीत जास्त ९० दिवसात सादर करणे अपेक्षित असताना प्रतिवादी यांनी विहित वेळेत न दाखल केल्यामुळे त्यांच्या विरुध्द् विना लेखीजबाब आदेश पारीत झालेला आहे.

६. एकंदरीत वादी व प्रतिवादी यांचा युक्तीवाद बघता प्रतिवादी यांनी विलंबाने लेखीजबाब दाखल केलेला आहे ही बाब वादातीत नाही. परंतू कायदयान्वये जरी कमीत कमी ३० आणि जास्तीत जास्त ९० दिवसांचा कालावधी लेखीजबाब दाखल करण्यासाठी वेळोवेळी वाढवून देण्याचे प्रावधान असले तरी कायदयास असेही अभिप्रेत आहे की,प्रत्येक प्रक्रियेस विहित कालावधीत पूर्ण केल्यास प्रकरणे विहित कालावधीत निकाली काढता येतील. तसेच प्रस्तुत दावा कायदयानुसार गुणवत्तेवर निकाली काढण्याच्या दृष्टीने प्रतिवादी यांचा निशाणी क्र.१४ वरील अर्ज मंजूर केल्यास वादीचे कोणतेही नुकसान होण्याची शक्यता नाही. तेव्हा अशा परिस्थितीत प्रतिवादीस लेखीजबाब दाखल करण्यास परवानगी न दिल्यास त्यांचेवर अन्याय होण्याची शक्यता नाकारता येत नाही. परंतु प्रतिवादींना लेखीजबाब दाखल करण्यास झालेला विलंब हा खर्च रकमेवर मंजूर केल्यास नैसर्गिक न्यायाच्या दृष्टीने योग्य व न्यायोचित होईल. तेव्हा पुढीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो–

## आदेश

१ प्रतिवादी यांचा निशाणी क्र.१४ वरील अर्ज, खर्च रक्कम रु.५००/– ही जिल्हा विधि सेवा प्राधिकरण,जालना यांच्या कार्यालयात भरणा करण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येतो.

२ प्रतिवादी यांना लेखीजबाब दाखल करण्यास झालेला विलंब क्षमापित करण्यात येऊन त्यांचा लेखीजबाब अभिलेखावर घेण्याची परवानगी मंजूर करण्यात येते.

३ आदेशाप्रमाणे प्रस्तुत अर्ज निकाली काढण्यात येतो.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by MADHURI RAMNARAYANSINHA KHANWE
Date: 2023.03.20 16:32:09 +0530

(श्रीमती माधुरी रा.खनवे)
सह दिवाणी न्यायाधीश(व.स्तर)
जालना

दि.२०.०३.२०२३

**प्रमाणपत्र**

निवेदन करण्यात येते की, पी.डी.एफ.फाईल मधील शब्द न् शब्द मुळ आदेशाप्रमाणे आहे.

लघुलेखकाचे नाव :–शि.दि.देशमुख

न्यायालयाचे नाव :–सह दिवाणी न्यायाधीश(व.स्तर),जालना

पी.डी.एफ.दिनांक :–दि.२०.०३.२०२३

लघुलेखक(म.)